# नियमित दिवाणी दावा क्र. ९२/२०२४ मधील अर्ज निशाणी क्र. ०५ वर आदेश

१) प्रस्तुत अर्जाद्वारे वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ३९ नियम १ अन्वये प्रस्तुत दाव्याचा निकाल होईपावेतो वादशेतमिळकतीमध्ये प्रतिवादींनी त्रयस्थ व्यक्तीचे हक्क निर्माण करु नये अशा तात्पुरत्या मनाई हुकूमाची मागणी केली आहे.

२) मौजे पोखरापूर, ता. मोहोळ येथील गट क्र. ४३६ क्षेत्र ४८ आर ही शेतमिळकत दाव्याचा विषय असून सदर मिळकतीचा यापुढे 'वादशेती' असा संक्षिप्त उल्लेख करण्यात येतो.

३) मूळ दावा हा वादी हा वादशेतीचा मालक असल्याचे जाहीर होऊन मिळणेकामी व प्रतिवादींनी सदर मिळकतीमध्ये त्रयस्थांचे हक्क निर्माण करु नये म्हणून निरंतर मनाई हुकूमाकरीता केला असून त्यात वादीचे थोडक्यात कथन असे की, प्रतिवादी क्र. १ ही त्याची पत्नी आहे. प्रतिवादी क्र. २ हा त्यांचा मुलगा आहे. प्रतिवादी क्र. २ च्या जन्मानंतर काही दिवसांनी प्रतिवादी हे प्रतिवादी क्र. १ च्या माहेरी राहण्यास गेले. त्यानंतर त्यांनी प्रस्तुत वादी व इतर काहीजण यांच्याविरुध्द नि.दि.दा.क्र. १७/१९८९ दाखल करुन एकत्र कुटूंबाच्या मिळकतीचे वाटप व्हावे अशी मागणी केली होती. सदर प्रकरणात दि. २९/०६/१९९३ रोजी न्यायनिर्णय होऊन पोखरापूर येथील गट क्र. ३८८/४ण् ४३६ व ४२० या शेतमिळकतीमध्ये प्रस्तुत प्रतिवादींचा २/३ हिस्सा व प्रस्तुत वादीचा १/३ हिस्सा असल्याचे जाहीर करण्यात आले होते. त्यानंतर, सदरचे प्रकरण वाटपाकामी दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ५४ प्रमाणे मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविण्यात आले होते. मा. जिल्हाधिकारी यांनी सदरचे प्रकरण तहसिलदार मोहोळ यांच्याकडे वर्ग केले असता मोजणी खात्याकडून मोजणी करुन वाटप तक्ता करण्यात आला व त्यानुसार प्रस्तुत वादीला त्याच्या हिश्याच्या जमीनीचा ताबा देण्यात आला.

४) वादीचे पुढे असे कथन आहे की, या न्यायालयाने नि.दि.दा.क्र. १७/१९८९ मध्ये पारीत केलेल्या हुकूमनाम्याप्रमाणे वाटप होण्यापूर्वीच प्रस्तुत प्रतिवादींनी वादशेतीमध्ये त्यांचा प्रत्येकी १/३ हिस्सा असल्याचे नमूद करुन वादशेतीच्या महसूल दप्तरी त्यांची नावे लावली होती. वाटप तक्ता कायम झाल्यानंतर सदरची नावे कमी करण्यात आली नाहीत. प्रस्तुत वादीला नि.दि.दा.क्र. १७/१९८९ मधील न्यायनिवाडयाप्रमाणे संपूर्ण वादशेती व गट क्र. ४२० पैकी काही क्षेत्र वाटपात मिळालेले आहे. वाटप तक्ता कायम झाल्यानंतर वादशेतीच्या महसूल दप्तरी असलेली प्रतिवादींची नावे कमी होणे आवश्यक होते. सदरची बाब महसूल विभागाच्या निदर्शनास आणून दिल्यावर त्यांनी ती कमी केलेली नाहीत. प्रतिवादींच्या नावाची वादशेतीच्या महसूल दप्तरी असलेली नोंद पोकळ स्वरुपाची आहे. मात्र, प्रतिवादींनी वादशेतीपैकी काही हिश्यावर महसूल दप्तरी त्यांची नावे असल्याचा गैरफायदा घेऊन सदरचा हिस्सा विक्रीस काढल्याचे निदर्शनास आले. दि. २७/०२/२०२४ रोजी पोखरापूर येथील काही इसम वादशेतीमध्ये आले होते. त्यांनी सदरची जमीन खरेदी करावयाची असल्याचे सूचित केले. त्यावेळी त्याने त्यांना वस्तुस्थिती समजावून सांगितली. तसेच प्रतिवादी यांना संपर्क करुन त्यांची नावे कमी करण्यास सांगितले. मात्र, ते ऐकण्यास तयार नाहीत. ते वादशेती विक्री करण्याच्या प्रयत्नात आहेत. सबब, वादीने प्रस्तुत दाव्याद्वारे तो संपूर्ण वादशेतीचा मालक असल्याचे जाहीर होऊन मिळावे म्हणून व प्रतिवादींनी वादशेतीच्या महसूल दप्तरी असलेल्या त्यांच्या नावाचा गैरफायदा घेऊन वादशेतीत त्रयस्थ व्यक्तीचा हक्क निर्माण करु नये असा निरंतर हुकूम मिळावा अशी विनंती केली आहे.

५) वादीने प्रस्तुत अर्जाद्वारे दावा प्रलंबीत असताना प्रतिवादींनी वादशेतीमध्ये त्रयस्थ व्यक्तीचे हक्क निर्माण करु नये अशा तात्पुरत्या मनाई हुकूमाची मागणी केली आहे.

६) प्रतिवादींनी म्हणणे (नि.क्र. २४) दाखल करुन प्रस्तुत अर्जास विरोध केला

आहे. ते वादीशी असलेले नातेसंबंध मान्य करतात. मात्र, वादीने प्रतिवादींकडे केलेल्या दुर्लक्षामुळे व त्यांचा सांभाळ करण्यास दिलेल्या नकारामुळे त्यांनी नि.दि.दा.क्र. १७/१९८९ दाखल केल्याचे व सदर प्रकरणातील दि. २९/०६/१९९३ रोजीच्या न्यायनिवाडयानुसार त्यांना तसेच प्रस्तुत वादीला गट क्र. ३८८/४, ४२० व ४३६ या तिनही जमीनीमध्ये प्रत्येकी १/३ हिस्सा मिळाल्याचे त्यांचे कथन आहे. सदर प्रकरणातील हुकूमनाम्यानुसार फेरफार नोंद क्र. ३३३९ मंजूर झाल्याचे परंतु प्रस्तुत वादी हा त्यांना त्यांच्या हिश्याचा ताबा देत नसल्याने त्यांनी नि.दरखास्त क्र. ७७/१९९७ दाखल केल्याचे व त्यानुसार वाटप होऊन नोंदी झाल्याचे ते नमूद करतात. प्रस्तुत वादीने त्यांच्याविरुध्द नि.दि.दा.क्र. ३८/२००२, नि.दि.दा.क्र. १९५/२०१० दाखल करुन व त्यांच्यावर गुन्हे दाखल करुन त्यांना वेळोवेळी त्रास दिल्याचे त्यांचे कथन आहे. वादशेतीच्या महसूल दप्तरी झालेली त्यांच्या नावाची नोंद पोकळ स्वरुपाची असल्याचे भासवून वादी हा न्यायालयाची दिशाभूल करण्याच्या प्रयत्नात असल्याचे तसेच प्रतिवादी क्र. २ हा सज्ञान झाल्यानंतर त्याच्या नावापुढे अपाक म्हणून प्रतिवादी क्र. १ च्या नावाची असलेली नोंद ही महसूल नोंद क्र. ६०६५ अन्वये कमी झाल्याचे त्यांचे कथन आहे. केवळ, न्यायालयाची दिशाभूल करुन वादी तात्पुरता मनाई हुकूम मिळवू पाहत असल्याने व वादीची बाजू प्रथमदर्शनी संयुक्तीक नसल्याने तसेच अनुकूलतेचा कल वादीच्या पक्षात नसल्याने व तात्पुरता मनाई हुकूम पारीत न झाल्यास वादीचे कुठलेही नुकसान होणार नसल्याने प्रस्तुतचा अर्ज खर्चासह नामंजूर व्हावा अशी त्यांची विनंती आहे.

७) उभयपक्षांचा युक्तीवाद ऐकला. दावा, अर्ज व म्हणणे तसेच उभयपक्षांनी दाखल केलेल्या कागदपत्रांचे वाचन केले.

८) उभय पक्षांचे कथन व प्रतिकथन यांचा विचार करता माझेसमोर पुढील विचारार्थ बाबी निर्माण होतात. त्यांचे निष्कर्ष त्यापुढे येणाऱ्या कारणमिमांसेस अनुसरुन

पुढीलप्रमाणे नोंदविले आहेत ,

| अ.क्र. | विचारार्थ बाबी | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | तात्पुरता मनाई हूकूम मिळणेकामी वादीची बाजु प्रथमदर्शनी संयुक्तिक आहे काय ? | होय. |
| २. | वादीच्या बाजुने अनुकुलतेचा कल आहे काय ? | होय. |
| ३. | तात्पुरते हुकुमाचा आदेश वादीचे पक्षात न झाल्यास त्याचे अनिरसनीय नुकसान होईल काय ? | होय. |
| ४. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे अर्ज मंजूर. |

## कारणमिमांसा

**विचारार्थ बाबी क्र. १ ते ३ करीता** –

**९)** सदरच्या तिनही बाबी एकमेकांशी निगडीत असल्याने त्या एकत्रीतपणे विचारात घेत आहे.

**१०)** उभय पक्षांचे कथन विचारात घेण्यापूर्वी हे नमूद करणे उचित वाटते की, वादी व प्रतिवादी यांच्यामधील नातेसंबंध उभय पक्षांना मान्य आहेत. तसेच, पोखरापूर येथील गट क्र. ३८८/४, ४३६ व ४२० या शेतमिळकती वादी व प्रतिवादी यांच्या वडीलोपार्जित मिळकती होत्या व प्रतिवादींनी नि.दि.दा.क्र. १७/१९८९ दाखल करुन वाटपाची मागणी केली असता सदर प्रकरणामध्ये दि. २९/०६/१९९३ रोजी न्यायनिर्णय होऊन वादी व प्रतिवादी यांना प्रत्येकी १/३ हिस्सा मंजूर झाल्याचे उभय पक्षांना मान्य आहे. त्याचप्रमाणे सदर प्रकरणामध्ये दरखास्त दाखल केली असता प्रकरण

महसूल विभागाकडे वर्ग झाले असता त्याठिकाणी वाटपाचा तक्ता होऊन वाटप झाल्याची बाब सुध्दा उभय पक्षांना मान्य आहे. परंतु, वादीच्या कथनानुसार सदर वाटपामध्ये संपूर्ण वादशेती त्याच्या वाटणीस आली असून गट क्र. ३८८/४ हा पूर्णपणे प्रतिवादींच्या वाटणीस गेला आहे. तसेच गट क्र. ४२० पैकी १ हे ५८ आर क्षेत्र वादीला मिळाले असून उर्वरीत १ हे २७ आर क्षेत्र प्रतिवादींना मिळाले आहे. मात्र, सदर वाटपापूर्वी वादशेतीच्या महसूल दप्तरी प्रतिवादींच्या नावाची प्रत्येकी २६ आर क्षेत्रावर नोंद झालेली आहे. वाटप तक्त्यानंतर सदरची नोंद कमी होणे आवश्यक होते. मात्र ती कमी झालेली नाही. सदर नोंदीआधारे प्रतिवादी हे सध्या सदरचे क्षेत्र विक्री करण्याच्या प्रयत्नात आहेत.

**११)** प्रतिवादींच्या कथनानुसार नि.दि.दा.क्र. १७/१९८९ मध्ये त्यांना गट क्र. ३८८/४, ४२० व ४३६ मध्ये प्रत्येकी १/३ हिस्सा मिळाला आहे. त्यामूळे, वादशेतीच्या महसूल दप्तरी झालेली त्यांची नोंद रितसर आहे. केवळ, सदरची नोंद पोकळ स्वरुपाची असल्याचे नमूद करुन वादी न्यायालयाकडून तात्पुरता मनाई हुकूम मिळविण्याच्या प्रयत्नात आहे.

**१२)** निश्चितच, पूर्वी झालेल्या वाटपानुसार संपूर्ण वादशेती वादीला मिळाली आहे काय किंवा त्यामध्ये प्रतिवादींचा हिस्सा आहे काय हे ठरविण्याकरीता उभय पक्षांना पुरावा देण्याची संधी देऊन गुणवत्तेवर निर्णय होणे आवश्यक आहे. मात्र सद्यस्थितीत वादीद्वारा दाखल करण्यात आलेल्या वाटप तक्त्याचे व वाटपाकामी तहसिलदार मोहोळ यांनी दि. १८/१०/२००१ रोजी उभय पक्षकारांना पाठविलेल्या नोटीसचे तसेच महसूल नोंद क्र. २४८ चे अवलोकन करता संपूर्ण वादशेती वादीच्या हिश्यास दिली असल्याचे तसेच गट क्र. ३८८/४ हा पुर्णपणे प्रतिवादींच्या हिश्यास दिल्याचे व गट क्र. ४२० पैकी १ हे २७ आर क्षेत्र प्रतिवादींना व १ हे ५८ आर क्षेत्र वादीला दिले असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. त्यामूळे, वादीची बाजू प्रथमदर्शनी संयुक्तीक दिसून येते.

**१३)** नि.दि.दा.क्र. १७/१९८९ मधील न्यायनिवाड्यानुसार वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये महसूल विभागाकडून वाटप झाल्याचे व संपूर्ण वादशेती वादीच्या हिश्यास दिली असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. प्रतिवादी हे वादशेतीमध्ये त्रयस्थांचे हक्क निर्माण करणार नसल्याबाबत काही एक सांगत नाहीत. त्यामूळे, वादशेतीच्या महसूल दप्तरी असलेल्या नोंदीच्या आधारे प्रतिवादींद्वारा वादशेतीमध्ये त्रयस्थांचे हक्क निर्माण केले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामूळे, अनुकूलतेचा कलसुध्दा वादीच्या पक्षात दिसून येतो. तसेच, वादीच्या पक्षात तात्पुरता मनाई हुकूम पारीत न झाल्यास प्रतिवादींद्वारा वादशेतीमध्ये त्रयस्थांचे हक्क निर्माण केले गेल्यास वादीचे होणारे नुकसान अनिरसनीय असणार आहे. त्याचवेळी तात्पुरता मनाई हुकूम पारीत केल्याने प्रतिवादींचे काही एक नुकसान होणार नाही.

**१४)** या सर्व बाबींचा एकत्रीत विचार करता वादीची बाजू प्रथमदर्शनी संयुक्तीक असल्याचे, अनुकूलतेचा कल त्याच्या पक्षात असल्याचे व तात्पुरता मनाई हुकूम दिला न गेल्यास वादीचे अनिरसनीय नुकसान होणार असल्याच्या निष्कर्षास मी आलो आहे. सबब, विचारार्थ बाब क्र. १ ते ३ चा निष्कर्ष मी होकारार्थी नोंदवीत आहे.

**विचारार्थ बाब क्र. ४ करीता** –

**१५)** विचारार्थ बाब क्र. १ ते ३ वर नोंदविलेल्या निष्कर्षानुसार वादी हा प्रतिवादींच्या विरुध्द तात्पुरता मनाई हुकूम मिळण्यास पात्र असल्याचे सिध्द होते. सबब, विचारार्थ बाब क्र. ४ च्या अनुषंगाने मी पुढीलप्रमाणे आदेश करीत आहे,

## आदेश

१. अर्ज (नि. ५) मंजुर करण्यात येतो.

२. प्रस्तुत दावा प्रलंबित असेपावेतोच्या काळात प्रतिवादींनी मौजे पोखरापूर येथील

गट क्र. ४३६ चे महसूल दप्तरी असलेल्या त्यांच्या नावाच्या आधारे सदर शेतमिळकतीमध्ये त्रयस्थ व्यक्तीचे हक्क निर्माण करु नयेत असा तात्पुरता मनाई हुकूम पारीत करण्यात येतो.

३. खर्चाबाबत दाव्याच्या अंतिम गुणवत्तेवरील निर्णयाच्या वेळी आदेश करण्यात येईल.

४. वादी व प्रतिवादी यांनी प्रस्तुत आदेशाची नोंद घ्यावी.

PRAKASH GANPATRAO MAHALANKAR

Digitally signed by PRAKASH GANPATRAO MAHALANKAR
Date: 2025.03.19 17:21:26 +0530

(**प्र. ग. महाळंकर**)

दि. १८/०३/२०२५. सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, मोहोळ.

**C E R T I F I C A T E**

I affirm that, the contents of this PDF file of Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of Stenographer | : V. A. Dange |
| Court | : Jt. C.J.J.D., Mohol |
| Date | : 18/03/2025 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer | : 19/03/2025 |
| Judgment/Order Uploaded on | : 19/03/2025 |